अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

MO.9860898564

संपादक - दिपक थोरात

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -५९ | शनिवार दि.१८ नोव्हेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -59 | SATURDAY DT.18 NOVEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |


## भुजबळांविरोधात मोठा खुलासा करण्याची घोषणा करताच अंजली दमानिया पोलिसांच्या ताब्यात

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी शुक्रवारी अंबड येथील सभेत प्रक्षोभक भाषण केलं. छगन भुजबळ यांनी मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधात अनेक विधाने केली. मी कोणाच्या कष्टाचे खात नाही तर मी स्वतःच्या कष्टाचेच खातो, तुझ्यासारखे सासऱ्याच्या घरी तुकडे मोडत नाही,असे भुजबळ यांनी म्हटल्यानंतर अंजली दमानिया यांनी एक ट्वीट करत भुजबळांबाबत एक मोठा खुलासा करणार असल्याचं म्हटलं आहे'ओबीसी' मधील ६० टक्के लोक भाजपाला मतदान करतात. त्यामुळे जर 'ओबीसीं'च्या ताटातून काढून ते त्यांना (मराठा समुदाय) देणार असाल तर त्याचे परिणाम भोगावे लागतील,असं भुजबळ यांनी म्हटलं होतं. या सभेतून भुजबळांनी प्रक्षोभक भाषण केल्याचा आरोप करत अंजली दमानिया यांनी केला. आज भुजबळांचे भाषण ऐकून तळ पायाची आग मस्तकात गेली.कुणाच्या कष्टाचे खात आहेत भुजबळ? असा प्रश्न करत त्यांनी भूजबळांच्या घरासमोर येऊन खुलासा करणारअसल्याचं ट्विट केलं होतं. दमानिया यांच्या घोषणेनंतर मुंबई सांताक्रुज पोलिसांनी मंत्री छगन भुजबळ यांचे घर असलेल्या परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस फौज फाटा तैनात केला.

# ...म्हणून मी ओबीसी समाजाच्या सभेला गेले नाही; पंकजा मुंडेंनी सांगितलं अनुपस्थितीचं कारण

बीड- जालन्यातील अंबड येथे ओबीसी समाजाचा एल्गार मेळावा आज पार पडला.या सभेसाठी अनेक प्रमुख नेते उपस्थित होते. भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यादेखील या सभेसाठी हजर राहतीय अशी चर्चा होती. तसेच त्यांचा फोटो असणारे बॅनर देखील सभेठिकाणी लावण्यात आले होते. पण, पंकजा मुंडे सभेवेळी अनुपस्थित होत्या. त्यामुळे विविध चर्चा सुरु झाल्या होत्या.



पंकजा मुंडे यांनीच आपल्या अनुपस्थितीचं कारण सांगितलं आहे.त्या म्हणाल्या की, सर्व पक्षीय नेत्यांच्या ओबीसींच्या सभेमध्ये मी जाणं अपेक्षित होते. कारण, बॅनरवर देखील फोटो लावण्यात आले होते की मी येणार आहे. पण, प्रत्येक पक्षाने कोणत्या नेत्याला पाठवायचं याचा निर्णय घेतला होता. त्यात माझा समावेश नव्हता.

आमच्या पक्षाकडून आशिष देशमुख, देवयानी फरांदे इत्यादी नेत्यांना पाठवण्यात आलं होतं. मला पक्षाने सभेसाठी न पाठवण्याचा निर्णय घेतला होता. छगन भुजबळ यांची ही पीच होती आणि त्यावर त्यांनी चांगली बॅटिंग केली आहे, असं पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.

ओबीसी समाजाच्या एल्गार सभेत शुक्रवारी नेत्यांनी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. विशेषतः अजित पवार गटाचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी अत्यंत बोचऱ्या शब्दांत जरांगेंवर शाब्दिक हल्ला केला. छगन भुजबळ यांच्या टीकेमुळे भुजबळ-जरांगे वाद आणखी टोकाला गेला आहे. जरागे पाटलांनी देखील कडवट शब्दांत भुजबळांचा समाचार घेतला आहे.

## मराठवाड्याच्या हक्काचे साडेआठ टीएमसी पाणी जायकवाडी धरणात सोडा

### जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

बीड : नाशिक, अहमदनगर जिल्हातील ऊर्ध्व गोदावरी खोऱ्यातील धरणांमधून मराठवाड्याच्या हक्काचे ८.६०३ टीएमसी पाणी जायकवाडी धरणात सोडण्याच्या आदेशाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी माकप माजलगाव तालुका कमिटी शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्याकडे केली असून जिल्हाधिकाऱ्यांमार्फ त मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवण्यात आले आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियमानुसार समन्यायी पाणी वाटप धोरण ठरवण्यात आले आहे. २०१४ मधील निवाड्यान्वये मुंबई महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने कायदेशीर आधार घेऊन जायकवाडीच्या ऊर्ध्व भागातील धरण समूहातील समन्यायी पाणी वाटपाची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यकारी संचालक, पाटबंधारे विभाग यांना मिळालेल्या अधिकाराने यंदा नाशिक, अहमदनगर जिल्ह्यातील धरणातील अतिरिक्त पाणी जायकवाडी धरणासाठी सोडण्याची कार्यवाही ३१ ऑक्टोबर २०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु आज १६ दिवस झाले आहेत; अद्यापपर्यंत वरील धरण समूहातून पाणी सोडण्यात आले नाही. माजलगाव धरण मृतसाठ्याकडे जात असून जायकवाडीत केवळ ४६ टक्के जिवंत पाणी साठा उपलब्ध आहे. या धरणावर अनेक छोट्या-मोठ्या शहरांच्या तसेच छत्रपती संभाजीनगरसह उद्योग क्षेत्राच्या पाणीपुरवठा योजना आहेत.

संभाजीनगर, जालना, बीड, परभणी जिल्ह्यातील सिंचनासाठीचा डावा व उजवा कालवा असून त्यावर रब्बी हंगामाचे भवितव्य अवलंबून आहे. नाशिक, अहमदनगर जिल्ह्यातून मराठवाड्यासाठी हक्काचे पाणी सोडण्यात कुठल्याही तांत्रिक कारणाने दिरंगाई करू नका, अशी मागणी माकपचे माजलगाव तालुका सचिव मुसद्दीक बाबा, राज्य कमिटी सदस्य रोहिदास जाधव, जिल्हा कमिटी सदस्य ॲड. याकूब सय्यद, महावीर मस्के, सुहास जायभाये, सत्यजित मस्के, संकल्प साठे, भाऊसाहेब बादाडे, दिलीपकुमार शिनगारे या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

## खासगी पेढीतून घ्यावी लागतेय पिशवी:जिल्हा रुग्णालयाकडून विविध संस्था, संघटनांना शिबिर घेण्याचे आवाहन

# सिव्हिलच्या रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा

बीड /प्रतिनिधी

आरक्षणासाठी होत असलेली आंदोलने, हिंसाचारानंतर बदललेली परिस्थिती यामुळे जिल्ह्यात रक्तदान शिबिरांमध्ये घट झाली असून याचा परिणाम म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या रक्तपेढीत रक्ताची टंचाई निर्माण झाली आहे. यामुळे रुग्णांना अधिकची रक्कम देऊन खासगी रक्तपेढीतून रक्त विकत घ्यावे लागत आहे. तर, थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांनाही गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे सातत्याने शिबिरांचे आयोजन करणाऱ्या आयोजकांना जिल्हा रुग्णालयाकडून संपर्क करून शिबिर घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालयात रक्तपेढी आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णाला रक्ताची आवश्यकता असेल तर या रक्तपेढीतून मोफत रक्त दिले जाते. दरम्यान, मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात मराठा आरक्षण आंदोलनाची धग आहे. या आंदोलनाला बीडमध्ये हिंसक वळण लागल्याने संचारबंदी लागू होती, बससेवा बंद होती. तरुणांची पोलिसांकडून धरपकड होत आहे. ओबीसी बांधवही आंदोलने करत आहेत. या सर्व परिस्थितीमुळे जिल्हा रुग्णालयाच्या रक्तपेढीकडे रक्तदान शिबिरांसाठीची नोंदणी घटली आहे. शिबिरे बंद पडल्यात जमा आहेत. जिल्हा रुग्णालयाच्या रक्तपेढीला सर्व रक्तगटांच्या मिळून दररोज किमान ५० ते ६० रक्तपिशव्यांची गरज भासते. मात्र सध्या रक्तपेढीकडे केवळ ३ ते ५ रक्तपिशव्याच दिवसाकाठी संकलित होत आहेत.खासगीमध्ये १५०० रुपये शुल्कजिल्हा रुग्णालयात रक्ततुटवडा असल्याने रुग्णांच्या नातेवाइकांना



खासगी रक्तपेढीतून रक्तपिशवी उपलब्ध करावी लागत आहे. खासगी रक्तपेढीचे शुल्क एका रक्तपिशवीसाठी सुमारे १५०० रुपये इतके आहे. मागील काही दिवसांत खासगी रक्तपेढ्यांमध्ये गर्दी वाढत आहे. खासगी रक्तपेढीत रक्तदान केल्याचे कार्ड असले तरी सुमारे ३०० रुपये इतके प्रक्रिया शुल्कही घेतले जाते.

# भविष्यात राजेंद्र मस्केंचे राजकारण बहरणार माजी मंत्री सुरेश नवले

## मस्के इन्फ्रास्ट्रक्चर आरएमसी प्लांटचा शुभारंभ व दीपावली स्नेह मिलन थाटात संपन्न

अनिल जगताप, शिवसंग्राम चे बागर, सोमनाथ माने, ज्ञानेश्वर आंधळे, रवींद्र गंगावणे, हरीश खाडे, प्रा. नारायण मस्के, तुकाराम घोडके, रवींद्र कळसाने, सचिन उबाळे, संतोष जाधव, प्रा. रामचंद्र मुळे, शाम बनवे, पारस ललवाणी, बाळासाहेब बायभट, दुष्यंत डोंगरे, जयश्रीताई मस्के, जयश्रीताई मुंडे, संध्याताई राजपूत, प्रीतताई कुकडेजा, शीतलताई राजपूत, अनिता जाधव, छायाताई मिसाळ, संतोष पावळे, रविराज गवते, शरद नवले, तालेब काका, शामराव तुपे, मच्छिंद्र सानप, उमेश खेडकर, केशव बडे, उद्धव घोलप, भूषण पवार, संतोष गोरे, अशोक वैद्य, बाळासाहेब डोळस, बाळासाहेब घोलप, शरद घोलप, नितीन आमटे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, सरपंच, उपसरपंच, चेअरमन आदि उपस्थित होते. मस्के परिवाराच्या वतीने

परिवाराच्या वतीने दिवाली स्नेहमिलन फराळाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या नवले कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रेम पूर्वक प्रतिसाद वेगळे दिला. महंतांच्या वतीने ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी शुभेच्छा व्यक्त करून आशीर्वाद दिले. तर बंचित आघाडीचे नेते अशोक हिंगे, विजयराज बंब, सौ. अर्चना कुटे यांनी समयोचित राजकारण करतो, तुम्ही भावंड म्हणजेच राजेंद्र मस्के परिवारावर लोढा, शिवसेना जिल्हाप्रमुख दाजी, मिसाळ काका, बजरंग देऊन सत्कार करण्यात आला.


महाराज भारती यांच्या शुभहस्ते आणि माजी मंत्री सुरेश नवले, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, उद्योगपती विजय बंब, दिलीप गोरे, द कुटे ग्रुपच्या मॅनेजिंग डायरेक्टर सौ. अर्चना कुटे, सर्जेराव तांदळे, नवनाथ शिराळे, राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष बबन गवते, कल्याण आखाडे आदि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. तसेचपरिवारांनी सत्यात उतरवला. व्यवसाय आणि राजकारणात फरक आहे. राजकारणात लोकावर अवलंबून राहावे लागते. राजकारणातला ग्राहक आहे. राजेंद्र मस्केचा संपर्क काम उत्तम असल्याने उदार मी त्यांचे कौतुक करतो. नारायण गडाचे महंत तब्बल दोन मस्के परिवाराला देतात

बीड- प्रतिनिधी संस्थानचे महंत ह.भ.प. तुकाराम भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के मनोगत व्यक्त करून मस्के व्यवसाय करा हा सल्ला मस्के नगद नारायणाची कृपा आहे. दीपावली पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर कै. तुकाराम गुरुजी नगर, चहाटा रोड बीड येथे मदन मस्के यांच्या इन्फ्रास्ट्रक्चर आरएमसी प्लांटचा भव्य शुभारंभ नारायण गडाचे महंत ह.भ.प. शिवाजी महाराज बंकटस्वामी संस्थांचे महंत ह.भ.प. मेंगडे महाराज, रामगड संस्थांचे महंत ह.भ.प योगीराज महाराज, बेलेश्वर परिवाराला शुभेच्छा दिल्या. मनोगत व्यक्त करताना प्रा. म्हणाले की, राजेंद्र मस्के मोठा आणि मदन मस्के हे बीड मधील प्रस्थ आहे. मदन काका अत्यंत कष्टाळू आणि प्रामाणिक चतुर आहेत. दूरदृष्टी ठेऊन उभा आणि केलेला टचउ प्लांट यशस्वी मनाने होईल. राजेंद्र बाबू अत्यंत बुद्धिवंत राजकारणी आहे. मी तास भविष्यात राजेंद्र मस्के चे राजकारण निश्चितपणे बहरणार आहे. अशा शुभेच्छा यावेळी त्यांनी व्यक्त केल्या. दीपावली स्नेहमिलानाच्या कार्यक्रमास राजकीय, सामाजिक, उद्योग, व्यवसाय क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून राजेंद्र मस्के परिवाराला शुभेच्छा दिल्या. यामध्ये प्रामुख्याने बाबुशेठ

प्रभाकर कोलगडे, अनिल घुमरे, सुहास पाटील, शांतीनाथ डोरले, किरण बांगर, सलीम जगाहीर, भास्करराव गायकवाड, विनोद पिंगळे, सीए अधव, जगदीश गुरखुदे, विक्रांत हजारी, डॉ लक्ष्मण जाधव, चंद्रकांत फड, अजय सवाई, अशोक लोढा, प्रकाश काका सुरवसे, ईश्वर पवार, गणेश उगले, सुनील अनभुले, शुभम भूत आदित्य सारडा, संतोष सोहनी, राजेश बंब, संपादक नरेंद्र



कांकरिया, वसंत मुंडे, शेख तय्यब, भागवत तावरे, वैभव स्वामी, सुरेश जाधव, अभिजित नखाते, दत्तात्रय नरनाळे, विष्णू बुरगे उपाध्याय सर, डॉ. अभय वनवे, विजय लाटे, बुरसाळे महाराज, सतीश लोढा, बालाजी पवार, डॉ. सुरेश जाधव, बळीराम चव्हाण, शरद झोडगे, शरद दुग्गड, अप्पासाहेब कागदे, रत्नाकर कुलकर्णी, तुकाराम जाधव, प्रभाकर आंधळे, पिंगळे उपस्थित सर्वांचा टोपी, उपरण देऊन सत्कार करण्यात आला.



सदर मयत हा राष्ट्रवादी भवन जवळ बीड येथे मयत अवस्थेत मिळून आला असून तो सरकारी दवाखाना बीड येथे पीएम रूम मध्ये ठेवलेला आहे सदर मयत यास कोणी ओळखत असल्यास पोलीस स्टेशन बीड शहर मोबाईल क्रमांक ०२४४२२२२ ३३४ या नंबर वर संपर्क करावा तसेच सरकारी दवाखाना पोलीस चौकी बीड पोलीस हवालदार ६५१ सावंत मोबाईल नंबर ९६०४६०८०८६ या नंबरवर संपर्क करावा

# तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायद्याचे नियम वेशीला टागले

### जागोजागी तयार होऊ लागले अड्डे कारवाईची मागणी

सुमेध करडे ।तलवाडा

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येणाऱ्या गावात राज रोज पणे खुलेआम खाना वळीच्या नावाने काही लोकांनी शक्कल लावून देशी विदेशी दारू खुले आम् विक्री करून स्थानिक पोलिसांच्या आशीर्वादाने आशा धंद्यावाल्या त सोन्याचे दिवस आले असून याकडे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक यांनी लक्ष घालून अशा धंद्यावर बेधडक कारवाई करण्याची मागणी नागरिकातून होत आहे

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील सर्वात मोठे गाव तलवाडा म्हणून ओळखले जाते गावात सर्व जाती धर्मातील लोक गुण्यागोविंदाने तसेच आनंदाने वावरताना दिसून येत आहे तसेच गावातील काही बोटावर मोजणे इतक्या लोकांनी रस्त्याच्या कडेला खानावळीची हॉटेल टाकून त्यात देशी-विदेशी दारू लायसन काढल्या जात खुल्या

## खानावळीच्या नावाने खुले आम दारू विक्री

आम् दिवसा ढवळ्या तसेच राजरोसपणे स्थानिक पोलिसांच्या आशीर्वादाने चालू असून गावात एखादा नवीन माणूस आल्यावर बिहारमध्ये आल्यासारखं वाटत असून जागोजागी असे खानावळच्या हॉटेल तयार तयार झाले असून त्यामध्ये गेवराई तलवाडा रस्ता तलवाडा भोगलगाव रस्ता तसेच गावातील असे बरेच हॉटेल तयार झाले असून लोकांवर कायद्याची पायमल्ली करणाऱ्या वर स्थानिक पोलीस लक्ष देत नसून उलट सुलट चर्चा होताना दिसून येत आहेयामुळे सुशिक्षित वर्ग अशा दुकानात जाऊन व्यसनाधीन होत असून आपले संसार उघड्यावर आणत आहेत एवढेच नाही तर ज्या ठिकाणी हे खानावळ हॉटेल सुरू असून दिवस रात्र सुरू आहेत यामुळे अशा लोकांमध्ये सोन्याचे दिवस आले असून आड माप पैसा कमवताना दिसून येत आहे लायसन नसल्यामुळे लायसन गत असे धंदे चालू असो शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बेशिस्तपणे पायाखाली तुडवत आहेत याकडे बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर साहेब यांनी लक्ष देऊन अशा लोकांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे



# कार्तिक एकादशी करिता विशेष ६ रेल्वे गाड्या

**परळी / प्रतिनिधी**

**कार्तिकी एकादशीनिमित्ताने विठुरायाच्या दर्शनाकरिता जाण्यासाठी रेल्वे मध्ये होणारी भाविकांची गर्दी लक्ष्यात घेता दक्षिण मध्य रेल्वेकडून पंढरपूर करिता अनारक्षित विशेष ६ गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला असून यातील ४ गाड्या ह्या परळीमार्गे धावणार आहेत. पंढरपूर येथील कार्तिकी एकादशी निमित्त होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वे ने पंढरपूर करीत अनारक्षित विशेष गाड्या चलविण्याचे ठरविले आहे, त्यामध्ये पहिली विशेष गाडी बिदर – पंढरपूर दि २२ रोजी सायंकाळी १०:१५ मिनिटास प्रस्थान करणार असून दुसऱ्या दिवशी दि २३ रोजी पंढरपूर–बिदर ही गाडी सायंकाळी०८ वाजता प्रस्थान करणार आहे.**

दुसरी विशेष गाडी ही आदिलाबाद–पंढरपूर कडे दि २२ रोजी दुपारी २ वा तर दि २७ रोजी पंढरपूर–आदिलाबाद ही गाडी सायंकाळी ८ वाजता प्रस्थान करणार आहे.तिसरी विशेष गाडी ही पंढरपूर–नांदेड दि २३ रोजी सकाळी ८:१५ ला प्रस्थान करणार आहे तर नांदेड– पंढरपूर ही गाडी दि २६ रोजी सायंकाळी ७:२० वा प्रस्थान करणार आहे.बिदर ते पंढरपूर विशेष गाडी दोन्ही दिशेला भाळकी, कमालनगर, उदगीर, लातूर रोड, लातूर, उस्मानाबाद, बारसी टावून आणि कुरडुवडी या रेल्वे स्थानकांवर थांबतील तर आदिलाबाद–पंढरपूर–आदिलाबाद विशेष गाडी प्रवासात दोन्ही दिशेला किनवाट, बोधडी, धानोरा, सहस्तरकुंड, हिमायतनगर, हडगाव रोड, भोकर, मूदखेड, नांदेड, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी, लातूर रोड, लातूर, उस्मानाबाद, बारसी टावून, कुरडुवडी रेल्वे स्थानकांवर थांबतील तर पंढरपूर–नांदेड– पंढरपूर विशेष गाडी प्रवासात दोन्ही दिशेला कुरडुवडी, बारसी, उस्मानाबाद, लातूर, लातूर रोड, परळी, गंगाखेड, परभणी, पूर्णा रेल्वे स्थानकांवर थांबेल.

# पाणी टंचाईचे तालुका प्रशासनाला गांभिर्य नाही –आ.लक्ष्मण पवार



गेवराई: मतदारसंघात पाऊस कमी झाला आहे त्यामुळे अनेक गावांत पाणी टंचाई निर्माण झाली आहे असल्याच्या तक्रारी येऊ लागल्या आहेत म्हणून गेवराई तहसील कार्यालयात पाणी टंचाई आढावा घेण्यासाठी बैठक घ्यावी अशी सूचना तहसीलदार संदिप खोमणे यांना केली होती पण तहसीलदार यांनी दोन वाजता वेळ मागितला होता त्यामुळे आपण दोन वाजता तहसील कार्यालयात गेलो होतो पण तिथे फक्त तहसीलदार एकटेच उपस्थित होते त्यामुळे आम्ही बैठक रद्द करून प्रशासनाला पाणी टंचाईचे गांभिर्य नसल्याचे आमच्या लक्षात आले यामुळे पाणी टंचाईचे गांभिर्य नसलेल्या अधिकारी व कर्मचारी यांची जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे आ.लक्ष्मण पवार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे

दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात आ.लक्ष्मण पवार म्हणाले की पाऊसाचे प्रमाण कमी झाले आहे त्यामुळे गेवराई तालुक्यातील काही गावात पाणी टंचाई असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती

# भाविकांच्या सुविधेसाठी महाराजा रणजीत सिंघ जी यात्री निवासच्या बहुमजली ईमारतीचे भूमिपुजन संपन्न

नांदेड : प्रतिनिधी

नांदेड:- तख्त सचखंड श्री हजूर अबिचलनगर साहिबच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन शेर–ए–पंजाब महाराजा रणजीत सिंघ जी यात्री निवासची बहुमजली ईमारत बांधण्याचा निर्णय गुरुद्वारा सचखंड साहिबच्या प्रशासनातर्फे घेण्यात आला. त्या अन्वये आज दि. १७/११/२०२३ रोजी सदरील ईमारतीचे भूमिपूजन संत बाबा कुलवंत सिंघ जी – हैड जत्थेदार व माननिय पंजप्यारे साहिबान – तख्त सचखंड श्री हजूर साहिब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रामुख्याने गुरुद्वारा सचखंड साहिबचे माननिय प्रशासक – डॉ. स. विजय सतबीर सिंघ जी ख–ड (ठ), व संत बाबा नरिन्दर सिंघ जी – मुखी गुरुद्वारा लंगर साहिब आणि संत बाबा बलविंदर सिंघ जी कार सेवा वाले तसेच गुरुद्वारा बोर्डचे अधीक्षक– स. ठाण सिंघ बुंगई उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. विजय सतबीर सिंघ ख–ड (ठ) यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगीतले कि तख्त सचखंड श्री हजूर साहिबच्या दर्शनासाठी ग्रामिण भागातून येणाऱ्या भाविकांची संख्या ही खुप असते त्यामुळे त्यांना समोर ठेऊन ही ईमारत बांधण्यात येईल. या इमारतीत ४०० खोल्या, ए/सी. सुट्स व नॉन ए/सी खोल्या असतील. या ईमारतीत तळमजल्यावर पार्किंगची योग्य व्यवस्था तसेच विशाल आधुनिक गठडीघर व महिला व पुरुषांसाठी वेगवेगळे आधुनिक शौचालय बांधण्यात येणार आहेत.या बहुमजली इमारतीची सेवा संत बाबा नरिन्दर सिंघ जी व संत बाबा बलविन्दर सिंघ जी यांना सुपुर्द करण्यात आलेली आहे.

यावेळी गुरुद्वारा बोर्डाचे सहा. अधीक्षक – स. हरजीत सिंघ कड़ेवाले, स. रविन्दर सिंघ कपुर, स. जयमल सिंघ ढिल्लो (पी.ए.) व स. रविन्दर सिंघ हजूरीया (इंजिनियर) हे उपस्थित होते.

# गुलाब बजाज यांचा शेतकऱ्यांनी केला सत्कार

माजलगाव, (प्रतिनिधी) शहरातील प्रगतशील शेतकरी गुलाब बजाज यांनी शेतक–यांना हवामानाचा चांगला अंदाज दिला व त्यांनी वर्तविलेला अंदाज तंतोतंत खरा ठरला असल्याने शेतक–यांच्या वतीने पाडव्यादिवशी त्यांचा शेतकरी बजाज यांचा सत्कार केला.

शेतकरीमित्रांनी पाडव्या चे निमित्त साधून वनभोजन आणि उत्कृष्टशेती आचुक हवामान आंदाज यामुळे गुलाब बजाज,अजय बुरांगे, ख.वि. संघाचे व्हा. चेअरमन भालचंद्र पाठक यांचा पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी छोट्याखानी खूप चांगला भव्य असा सत्कार केला. यावेळी छगनराव जाधव व शेतकरी उपस्थित होते. सत्काराला उत्तर देतांना श्री. बजाज म्हणाले कि, भविष्यातहि या वर्षी प्रमाणे आपल्या शिवारातील प्रत्येक शेतकऱ्याचे पाऊसामुळे काडीचे ही नुकसान होणार नाही याची काळजी घेणार असल्याचे सांगितले.



हवामानाचा चांगला अंदाज दिल्याबद्दल शेतकऱ्यांनी केला सन्मान

# राज्य खो–खो स्पर्धेसाठी बीड जिल्ह्याचा पुरुष व महिला संघाची निवड



बिड :- परभणी येथे दि.१७ ते २० नोव्हेंबर यादरम्यान होणाऱ्या पुरुष/महिला राज्यस्तरीय खो–खो स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वशी बीड जिल्ह्याचे पुरुष व महिला दोन्ही संघाची निवड करण्यात आली. या संघामध्ये पुरुष संघ – दिपक घोडके, बाळनाथ शिंदे, शुभम बहिर, तुकाराम करंडे, विशाल जगताप, प्रतीक कवडे, रवी नरनाळे, प्रेम कवडे (सर्व बीड) अभिषेक हिवाळे, नवनाथ चव्हाण, वेदांत काळे, अक्षय प्रधान राज शिंदे, गायकवाड विश्वजीत (सर्व गेवराई) सोमनाथ मंडलिक,(सर्व पाटोदा) संघासाठी प्रशिक्षण श्री.योगेश सोळसे (बीड) व्यवस्थापक श्री सुधीर हजारे (बीड)

महिला संघ– साक्षी कांबळे, वैष्णवी बन, अंकिता गिरी, जाधव ऋतुजा, गुंडा अपूर्व, घाडगे दिपाली, जाधव पूजा, डावकर प्राची (सर्व बीड) गायत्री बोरकर, आर्या कांबळे, पियुषा जाधव, पर्वती बोरकर, स्नेहल पवार, रोहिणी आडे (सर्व गेवराई) वनवे साक्षी पाटोदा प्रशिक्षक श्री भागवत ठोकरे (बीड) व्यवस्थापक अंजली खरात (गेवराई) हे दोन्ही संघ बीड जिल्ह्याचे राज्य स्पर्धेमध्ये नेतृत्व करणार आहेत. पुरुष खेळाडूंचा१० दिवसापासून प्रशिक्षण शिबिर शारदा स्पोर्ट्स अकॅडमी गेवराई या ठिकाणी पार पडले. तसेच महिला गटाचे प्रशिक्षण शिबिर खो–खो प्रशिक्षण केंद्र जि.परिषद कन्या शाळा पिंपळनेर या ठिकाणी घेण्यात आले.या खेळाडूंना श्री.ऋषिकेश शेळके प्रा.जे.पी.शेळके प्रा.राजेंद्र बरकसे जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती सुहासिनी देशमुख श्री रमेश (भाऊ)शिंदे श्री.कैलास गवते, बापूसाहेब तारूकर ,संघटनेचे सचिव श्री.विजय जाहेर मनोज जोगदंड, योगेश सोळसे, विष्णू काकडे, गोकुळ रेंगे, नितीन काकडे, नितीन येळवे, अशोक चौरे, रवी उबाळे, अविशांत कुमकर, प्रफुल हाटवटे,नितीन पुटवाड, रवींद्र खरात, विष्णू आदनाक,सर्वांनी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# बांधकाम कामगारांचे बांधकामगार योजनेत नाव नोंद करून त्यांचे रिन्यूअल तात्काळ करा --नवीदोद्दिन सिद्दिकी

माजलगाव ( प्रतिनिधी)

महाराष्ट्र बांधकामगार व इतर कामगार कल्याणकारी योजने मध्ये होत असलेले भ्रष्ट कारभार ची चर्चा वर्चस्ववर अनेक वर्षापासून या महाराष्ट्र बांधकामगार व इतर कामगार कल्याणकारी मंडळ च्या योजना असून पन्नास टक्के गोरगरीब दिन दळीत मोलमजुरी कष्ट काम करणारी जनता वंचित राहिलेली आहे सध्याचे दुष्काळग्रस्त काळात जनतेची राहिलेली कामगार नोंद करून घ्यावे व राहिलेले मजदूरांना न्याय मिळवून घ्यावे अशी मागणी मात्र जनतेतून होत आहे मागणी पूर्ण करावी यासाठी आंदोलनाचा इशारा एम. आय. एम. युवा नेते तथा महाराष्ट्र राज्य बांधकामगार सेना



संघटनेचे तालुका अध्यक्ष नवीदोद्दिन सिद्दिकी यांनी केली आहे नसता महाराष्ट्र राज्य बांधकामगार सेना संघटनाच्या संस्थापक अध्यक्ष परमिलाताई माळी अशोक ओतारी व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष समीर काजी मराठवाडा अध्यक्ष नवीद बाबा खान तथा बीड जिल्हा अध्यक्ष सय्यद फरहान भाऊ यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातले विविध तालुक्यांमध्ये बेमुदत धरणे आंदोलन छेडणार असाही इशारा एम. आय. एम. युवा नेते तथा महाराष्ट्र राज्य बांधकामगार सेना संघटनेचे तालुका अध्यक्ष नवीदोद्दिन सिद्दिकी व त्यांचे शिष्ट मंडळांनी दिला



**तामसा:– येथील पोलिस स्टेशन कार्यालयात क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांच्या १४८ व्या जयंती निमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी स. पो. नि. मुंजाजी दळवे आणि ईतर कर्मचारी बांधव.**
**छाया:– संतोष डवरे, हदगाव**

# पैठण येथे ’स्वाभिमानी’च्या वतीने रास्ता रोको आंदोलन

पैठण / प्रतिनिधी

चालू हंगामात उसाला सर्व साखर कारखानदारांनी ३१०० रुपये दर द्यावा, यासह विविध मागणीसाठी (दि.१६) पैठण येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी पैठण शहागड फाटा, शेवगाव, पाचोड रोडवर ऊस वाहतूक ठप्प झाल्यामुळे लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या.स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती संभाजी नगर जिल्हा युवक अध्यक्ष ज्ञानदेव मुळे यांच्या उपस्थितीत हे आंदोलन केले. यावेळी मराठवाड्यात सामान्यायी धोरणानुसार नाथसागर धरणामध्ये वरील धरणातून तात्काळ पाणी न सोडल्यास पैठण धरणातून वेगवेगळ्या ठिकाणी होणारा पाणीपुरवठा बंद करून आंदोलन सुरू करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. शेतकऱ्यांना अग्रिम नुकसान पीक विमा, आपेगाव, हिरंडपुरी बंधाऱ्यासह खेर्डा बंधाऱ्यात पाणी सोडण्यात यावे, जिल्ह्यातील साखर कारखान्याचे वजन काटे संगणकीकृत व ऑनलाइन करण्यात यावे, आदी मागण्या करण्यात आल्या.

यावेळी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे, पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. या आंदोलनात शिवाजी साबळे, संतोष तांबे, बंडू धरफळे, योगेश घोणे, गणेश भुजबळ, बाबुराव बोरुडे, महेश लांडगे, राहुल लांडगे, संतोष औटे, सतीश नरके, निवृत्ती पैठणे, कृष्णा काळे, अशोक नरके, भाऊसाहेब नरके, उद्धव मापारी, संदीप वाकडे, शिवाजीराव धरपडे, राहुल औटे आदीसह विविध शेतकऱ्यांचा सहभाग होता.

# बचत गटाच्या दिवाळी फराळ विक्री प्रदर्शनात ८७ लाखांची विक्रमी विक्री

## जिल्हा परिषदेने घेतला होता पुढाकार; फराळासह, हस्तकलेच्या साहित्यांची विक्री

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात उमेद अंतर्गत कार्यरत जिल्ह्यातील महिला बचत गटांनी उत्पादन केलेल्या विक्री प्रदर्शनामध्ये सुमारे ८७ लाख ०७ हजारांची रुपयांची विक्रमी विक्री झाली. दिवाळी निमित्त बीड जिल्यात व तालुका स्तर व गाव स्तरावर बचत गटाचे स्टॉल लावण्यात आलेले होते . जिल्हा स्तरीत विक्री प्रदर्शन हे जिल्हा परिषदेच्या प्रांगणात लावण्यात आले होते या मध्ये २१ गटांनी सहभाग नोंदवून दिवाळी फराळ व साहित्याची विक्री केली. जिल्हा स्तरीय विक्री प्रदर्शन दिनांक ०६ ते ०९ या कालावधीत भरवण्यात आले होते परंतु नागरिकांचा प्रतिसाद पाहता आणखी ०२ दिवस वाढवून एकूण ०६ दिवस भरवण्यात आले. या ०६ दिवसात जिल्हास्तरावर ४.५० लक्ष रुपयांची विक्री झाली.या वर्षीही बीड जिल्हा दिवाळी विक्री व प्रदर्शन मध्ये राज्यात अव्वल.गेल्या वर्षी ही २७ लक्ष रु ची विक्रमी विक्री झाली होती.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अविनाश पाठक व प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील यांच्या संकल्पनेतून या प्रदर्शनाचे

आयोजन केले होते. दि. ०६ ते ११ या दिवसाच्या कालावधीत दिवाळी फराळ, चिवडा, करंजी, चकली, ज्वारीची शेव, सुकामेवा, हस्तकला साहित्य, उठणे, माण, आकाशदिवे अशा नावीन्यपूर्ण उत्पादनाचे जिल्हा, तालुकास्तर व गावस्तर प्रदर्शन होते. प्रत्येक तालुक्यातील






मोठ्या ग्रामपंचायती व बाजारपेठेचे गावात महिलांनी स्टॉल व दुकाने मांडून एकूण ८७ लक्ष रुपयांची विक्री केली आहे . दिवाळी फराळ, पणत्या, दिवाळी साहित्य, रेडिमेड कपडे, साड्या, ड्रेसेस,, बांगड्या, चप्पल, सजावटी वस्तू, ज्वेलरी इत्यादी वस्तूचे स्टॉल व दुकाने गावात लावून महिलांनी विक्री केलेली आहे.जिल्हास्तर एकूण २० स्टॉल, तालुकास्तर स्टॉल, गावस्तरीय .....स्टॉल लावण्यात आले हिते व या मध्ये एकूण ....गटातील उद्योजक व व्यवसायीक महिलांनी स्टॉल च्या माध्यमातून विक्री एकूण ८७ लक्ष रुपयांची विक्रमी विक्री केली.तालुक्याच्या प्रत्येक पंचायत समिती च्या आवारात दिवाळी स्टॉल लावण्यात आले. एकूण ११ तालुक्यतील ३५४.... गटांनी स्टॉल लावण्यात आले या मधून ८७ लक्ष रुपयांची विक्री करण्यात आली बीड, वडवणी, शिरूर, परळी या तालुक्यांनी दिवाळी फराळ साहित्याची गिफ्ट किट तयार करून विक्री केले.

जिल्हा अभियान व्यवस्थापक, सर्व जिल्हा व्यवस्थापक तालुका अभियान व्यवस्थापक व तालुका व्यवस्थापक प्रभाग समन्वयकांनी तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केल्याची माहिती जिल्हा व्यवस्थापक श्री शकील शेख यांनी दिली.

बीड जिल्ह्यातील बचतगट चळवळ अजून सक्षम करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात. ग्रामीण भागातील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात, त्यांना रोजगार मिळावा यासाठी उमेदच्या जिल्हा माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जातात.दिवाळीनिमित्त आवश्यक असलेल्या वस्तु व फराळही बचतगटाकडून प्रत्येक वर्षी तयार केले जाते. ग्रामीण भागील महिला बचत गटातील होतकरू उद्योजक महिलांनी तयार केलेल्या दर्जेदार वस्तू तसेच चविष्ट दिवाळी फराळ व इतर साहित्य याला योग्य ती बाजारपेठ व व्यासपीठ मिळवून देणे हाच या दिवाळी महोत्सव विक्री प्रदर्शनाचा मुख्य हेतू होता

# दिवाळीनंतरच्या पहिल्याच कॅबिनेटमध्ये सात मोठे धमाके!

## राज्यातील पीक पाण्यासह दुष्काळी परिस्थितीचाही घेतला आढावा



मुंबई ।प्रतिनिधी

राज्य मंत्रिमंडळाची दिवाळीनंतर आज मंत्रालयात बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील पीक पाण्यासह दुष्काळी परिस्थितीचाही आढावा घेण्यात आला. या बैठकीत मराठवाड्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.राज्यातीस १३४५ हेक्टर क्षेत्र सिंचित करण्यात येणार आहे. तर बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्राम पंचायत योजनेलाही मुदतवाढ देण्यात आली आहे. एक ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट्य गाठण्यासाठी विविध ३४१ शिफारशी करण्यात आल्या आहेत.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेले संक्षिप्त निर्णय मंगरूळपीर येथील सत्तर सावंगी बॅरेजला मान्यता. १३४५ हेक्टर क्षेत्र सिंचित होणार राज्यातल्या ग्रामपंचायत इमारतीच्या कामांसाठी निधी वाढवला बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्राम पंचायत योजनेलाही मुदतवाढ आता शिक्षण संस्था समूह विद्यापीठे स्थापन करू शकतात. मार्गदर्शक तत्त्वांना मान्यता राज्य आर्थिक सल्लागार परिषदेच्या अहवालाचे सादरीकरण एक ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट्य गाठण्यासाठी विविध ३४१ शिफारशी राज्यातील पीक पाण्यासह दुष्काळी परिस्थितीचाही घेतला आढावाराज्य मंत्रिमंडळाची दिवाळीनंतर आज मंत्रालयात बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील पीक पाण्यासह दुष्काळी परिस्थितीचाही आढावा घेण्यात आला. या बैठकीत मराठवाड्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.राज्यातीस १३४५ हेक्टर क्षेत्र सिंचित करण्यात येणार आहे.



लहुजी ब्रिगेड बहुउद्देशीय सामाजिक संस्था संस्थापक अध्यक्ष नितीन भैया साठे यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांती पिता लहुजी वस्ताद साळवे यांच्या २२९ व्या जयंतीनिमित्त सोलापूर येथील बेघर लोकांना वाडत्या ठंडचे प्रादुर्भाव पाहून ब्लँकेट व दिवाळी फराळ देऊन एक मदतीचा हात म्हणून मदत करण्यासाठी कायम तत्पर आहोत आसं संस्थापक अध्यक्ष नितीन भैया साठे यांनी सांगितले यावेळी नागेश वाघमारे दीपक लोटके नाना बडकर विकास मोरे शुभम साळुंखे एडवोकेट निलेश वाघमारे व भूषण साठे उपस्थित होते विषेश परिश्रम नागेश वाघमारे दीपक लोटके नाना बडकर विकास मोरे यांनी घेतले.

# बीड जिल्ह्यासाठी पूर्ण वेळ कायमस्वरूपी जिल्हा वक्फ अधिकारीची तात्काळ नेमणूक करा

## अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करून - तहरिक - ए - इनाम

बीड / प्रतिनिधी

जिल्ह्यासाठी पूर्ण वेळ कायमस्वरूपी जिल्हा वक्फ अधिकारीची तात्काळ नेमणूक करण्यात यावी अशी मागणी तहरिक - ए - इनाम फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे. असे की,बीड जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ कार्यालय अंतर्गत येणाऱ्या मस्जिद,दर्गा,ईदगा,कब्रस्तान,अशुरखाना इत्यादी धार्मिक स्थळांच्या अंदाजे सत्तावीस हजार एकर कृषी व अकृषी उपयोगी इनामी जमिनीचा समावेश असून बीड जिल्ह्यामध्ये इनामी जमीन धारकांची मोठी संख्या आहे.सदरील देवस्थानचे मुतवल्ली, इनामदार,खिदमतगर व त्याचप्रमाणे इनाम जमीन धारक,इनामदार व भाडेकरू यांची विरासत,भाडेपट्टे नूतनीकरण,नवीन मुतवली,इमाम,मोजन,काझी यांची नियुक्ती अशा विविध प्रश्नांसाठी जिल्हाभरातून सामान्य नागरिक जिल्हा वक्फ कार्यालयात येत असतात त्यांचे असे अनेक प्रश्न बीड जिल्हा वक्फ कार्यालयाला पाच ते सहा वर्षापासून पूर्णवेळ कायमस्वरूपी जिल्हा वक्फ अधिकारी नसल्यामुळे प्रलंबित आहे.व त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यात गेल्या काही वर्षांपासून अवैध खालचे व देवस्थान जमिनीवर कब्जा करून अवैध प्रकारे फ्लोटिंग करून विकण्याचे ही प्रकार समोर आली असून या संदर्भातही जिल्ह्याभरातून अनेक अर्ज जिल्हा वक्फ कार्यालयात प्रलंबित आहे.

तेरी बीड जिल्ह्यासाठी पूर्ण वेळ कायमस्वरूपी जिल्हा वक्फ अधिकारी ची तात्काळनेमणूक करण्यात यावी अन्यथा या मागणीसाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी सकाळी ११:०० वाजल्यापासून जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय समोर तहरिक - ए - इनाम च्या वतीने धरणे आंदोलन करण्यात येईल असे तहरिक - ए - इनाम फाउंडेशनचे संस्थापक सचिव

पठाण अमर जान यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा वक्फ मंडळ कार्यालयत दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. यावेळी सय्यद समीर,शेख इलियास,शेख जमीर,शेख वसीम,फुरखान सिद्दिकी,मोहसीबी इनामदार सह तहरिक - ए - इनामचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कार्यसम्राट आ.लक्ष्मण पवार यांनी पर्यटन विकास योजने अंतर्गत जातेगाव येथील यमाई देवी देवस्थानासाठी पंचवीस लक्ष रुपये केले मंजूर

## गेवराई तालुक्यातील जातेगाव,कुभेजळगाव,भोजगाव, आकरा देवस्थानाला पर्यटन विकास योजने अंतर्गत पाच कोटी निधी मंजूर

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघातील देवस्थानाला कार्यसम्राट आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी पर्यटन विकास योजने अंतर्गत पाच कोटी रुपये निधी मंजूर केला असुन यात भोजगाव जगदंबा माता देवस्थानसाठी पंचवीस लक्ष रुपये,श्री क्षेत्र भाटेपुरी देवस्थान पंचवीस लक्ष रुपये,रोकडेश्वर मंदिर देवस्थान चकलांबा, पंचवीस लक्ष रुपये, यमाई देवी संस्थान जातेगाव पंचवीस लक्ष रुपये, श्री क्षेत्र गोरक्षनाथ कुंभेजळगाव पंचवीस लक्ष रुपये, श्री क्षेत्र खंडोबा मंदिर मन्यारवाडी पंचवीस लक्ष रुपये, सुभान संतु आई शिरस



मार्ग येथे एक कोटी रुपये, उमादेवी संस्थान उमापूर येथे पन्नास लाख रुपये, श्री क्षेत्र रामगड देवस्थान घोसापुरी पन्नास लाख रुपये , अशापुरक गणपती मंदिर पिंपळनेर एक कोटी रुपये,रामतिर्थ कुंडमठ मंदिर बहीरवाडी पन्नास लाख रुपये असे पाच कोटी रुपये पर्यटन विकास योजने अंतर्गत आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी गेवराई विधानसभा मतदारसंघातील देव देवस्थानाला मंजुर केल्याबद्दल मा सरपंच मोहन नाना देवकते, मनोज पाटील,महेश काका आहेर, गोपाल भैय्या चव्हाण,शेख शकील,पौळ काका, बळीराम करे, गौरव खरात,रवि आहेर, बाबासाहेब चव्हाण, कृष्णा पवार,यानी कार्यसम्राट आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांचे आभार मानले आहेत.

# कापसाला दहा हजार प्रती क्विंटल भाव द्या:- प्रा.गांडगे संदिप

नाळवंडी ।प्रतिनिधी

आपल्या महाराष्ट्रात सरासरीपेक्षा यावर्षी कमीच पाऊस पडलेला आहे आणि त्यातल्यात्यात मराठवाडा तर आज दुष्काळात होरपळून निघत आहे.यात सर्वात जास्त नुकसान जर कोणाच होत असेल तर शेतकऱ्यांच.कारण एकतर पाऊस नाही आणि पाऊस कमी असल्याने पिक चांगले आले नाहीत आणि जे दरवर्षी च्या तुलनेत यावर्षी तीस ते चाळीस टक्के पिक आले.त्यालाही आज बाजारात कवडीमोल भावाने विक्री करावी लागत आहे.या कवडीमोल भावाने विकलेल्या भावामुळे शेतकरी अजून जास्त संकटात



जात आणि शेतकऱ्यांना संकाटातुन बाहेर काढण्याचे काम शासनाच आहे. म्हणून जो काही बाजारात आलेल कापुस हे पिक आहे.त्याला तात्काळ दहा हजार प्रती क्विंटल भाव द्यावा आणि शेतकऱ्यांना आधार द्यावा.अशी मागणी प्रा. गांडगे संदिप यांनी माध्यमांशी बोलताना केली.

# आदित्य कृषि महाविद्यालयातील कृषिदूतांनी दिली जालना मर्चन्टस् को-ऑप. बँक लि.जालना , शाखा-बीड , बँकेला भेट

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत आदित्य शिक्षण संस्था सलंग्न आदित्य कृषि महाविद्यालयाचे कृषिदूत प्रफुल देवगडे, राम गडदे, महेश कवडेवार, अमोल चव्हाण, उमेश गायकवाड, ज्ञानेश्वर गौरकर, भागवत शिंदे, विशाल गंद्रेवाड यांचे ग्रामीण कृषि कार्यानुभव व कृषि औद्योगिक कार्यक्रम २०२३- २४ अंतर्गत कृषिदुतांनी जालना मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. जालना शाखा-बीड, बँकेला भेट दिली. व तसेच बँकेतील काम कश्याप्रकारे चालते हे समजून घेतले. यावेळी कृषिदूतांना मार्गदर्शन करण्यासाठी जालना मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. जालना शाखा-बीड बँकेतील श्री. दिपक. ज. सारडा सर यांनी.जालना मर्चन्टस् को-ऑप. बँके बद्दल सविस्तर माहिती दिली.सर्वप्रथम कृषिदूतांनी सर श्री. दिपक.ज. सारडा यांच्याकडून बँकेतील सर्व माहिती घेतली आणि बँकेत एक आठवडा कसे काम





करायचे हे समजून घेतले. त्यानंतर शेतकऱ्यांना विविध प्रकारचे कर्ज काढण्यासाठी कोणत्या प्रक्रिया असतात हे समजून घेतले. तसेच पुढील दिवशी बँकेत रक्कम जमा करण्यासाठीची प्रक्रिया , यावेळी सर श्री. दिपक.ज. सारडा यांनी सांगितली. यानंतर बँकेतून पैसे काढण्याची प्रक्रिया देखील कृषिदूतांना समजून सांगितली. त्यानंतर कृषिदुतांनी बँकेतील कागदपत्रे कश्या प्रकारे हाताळली जातात हे समजून घेतले. आणि बँकेतील विविध प्रकारचे कार्य कश्याप्रकारे चालते. हे यावेळी कृषिदुतांनी समजून घेतले. यासाठी कृषिदूतांना.जालना मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. जालना शाखा-बीड बँकेचे सर श्री. दिपक.ज. सारडा तसेच आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदितीजी सारडा, आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. सतीश कचरे सर , कृषि कार्यानुभव कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. संदीप मोरे, कृषि विस्तार विभागाचे प्रमुख धावणे सर यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.

# छगन भुजबळांचा मनोज जरांगेंवर हल्लाबोल

जालना : ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचाव एल्गार सभा जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील धाईत नगर येथे पार पडली. यावेळी एल्गार सभेचे आयोजक छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर हल्लाबोल केला. छगन भुजबळ यांनी आजच्या सभेत अंतरवाली सराटीमध्ये ज्या दिवशी लाठीचार्ज झाला तेव्हा काय घडलं ते सांगितलं.

छगन भुजबळ यांनी भाषणाच्या सुरुवातीलाचं शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि गोपीनाथ मुंडे यांचं स्मरण केलं. जालना जिल्ह्यात ६ जून १९९३ ला महात्मा फुले समता परिषदेची सभा झाली. त्या सभेत ओबीसी आरक्षण मंडल आयोग लागू करुन देण्याची मागणी केली. याच जिल्ह्यात ती मागणी पूर्ण करण्याचं वचन तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी दिलं. मंडल आयोग हा पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी स्वीकारला आणि ओबीसींना २७ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. मंडल यांचे सहकारी देशभर फिरले. आम्ही शरद पवार यांच्याकडे अंमलबजावणी केली. शरद पवार यांच्याकडे दुसऱ्या कुणाला आरक्षण देण्याचे अधिकार नव्हते, असं छगन भुजबळ म्हणाले.

आज मराठा समाजाचे नवे देव निर्माण झालेत त्यांचं म्हणनं असं आहे की धनगर, माळी, तेली मध्येच घुसले आहेत पण तुम्ही समजून घ्या, त्यांना कळणार नाही त्यांच्या डोक्या पलीकडील गोष्ट आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ३४० व्या कलमात सांगितलं होतं



# कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी कटीबद्ध्र- गजानन मुडेगावकर

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

पुत्रेश्वर बहुउद्देशीय सेवा भावी संस्थेच्या माध्यमातून मागील अनेक वर्षांपासून कामगारांचे प्रश्नसोडवण्यासाठी प्रयत्न केले जात असून भविष्यात ही कामगारांना अधिकाधिक योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कटीबद्ध असल्याची ग्वाही शिवसेना शहरप्रमुख तथा संस्थेचे अध्यक्ष गजानन मुडेगावकर यांनी दिली

बांधकाम कामगारांना अत्यावश्यक साहित्य असणार्या पेट्या चे वाटप कार्यक्रमात ते बोलत होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवसेनाप्रमुख विश्व हिंदूह्रदय सम्राट वंदनीय श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या अकराव्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन करण्यात आले यावेळी जिल्हा संघटक राजेभाऊ लोमटे, तालुका प्रमुख मदनलाल परदेशी, शहर प्रमुख गजानन मुडेगावकर, उपशहरप्रमुख शिवकांत कदम,मा.शहर समन्वयक अर्जुन जाधव,मा.तालुकाप्रमुख रमेश टेकाळे आदिंची प्रमुख उपस्थिती होतीपुढे बोलताना गजानन मुडेगावकर म्हणाले मागील १० वर्षांपेक्षा जास्त काळ पुत्रेश्वर बहुउद्देशीय सेवा भावी संस्थेच्या माध्यमातून कामगारांना व नागरिकांना विविध योजना देण्या साठी प्रयत्न केला जात आहे, यापुढेही कामगारांच्या साठी विविध योजना राबविण्यात येणार आहेत तेव्हा बांधकाम कामगार व ईतर कामगारांनी भट्ट गल्ली येथील कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहनही त्यांनी केले या वेळी अफसर बाबा, मिलिंद जोगी,श्रावण गायके आदींसह कामगार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित

# चांगले काम करणाऱ्या सफाई कामराचा दिवाळी भेट देऊन सत्कार

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील नगर परिषद माफ्फत स्वच्छतेचे खाजगी गुत्तेदाराकडे काम करणारे प्रमाणिक, जवाबदारी नियमित कामगार अविनाश जोगदंड व राम जोगदंड यांना येथील काळा मारूती गल्लीतील नागरिकांनी दिवाली निमित्त कुटुंबाला महिनाभर पूरेल एवढे किराणा सामान देऊन सत्कार केला.सामाजिक क्षेत्रातील निरागस सेवेचे कार्य असो अथवा शासकीय निमशासकीय सेवेत चांगले काम करणारे कर्मचारी असोत अशाचां सन्मान करणे ही अंबाजोगाई करांची संस्कृती आहे.

यापूर्वी ही अंबजोगाईकरानी चांगले काम करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांचा नागरी सत्कार करतात तर जे अधिकारी, कर्मचारी जनतेची कामे करत नाहीत अशाना गाडवावर बसवून धिंड काढण्यात कमी पडत नाहीत हा इथला इतिहास आहे. सत्काराने भारावलेले अविनाश जोगदंड बोलले माणूसकीच्या नात्याने दिवाळी



निमित्त दिलेले शंमर दोनशे रू.हे चहा पान यात आम्ही खर्च केले असते.मात्र इथे आमच्यसह आमच्या कुटुंबाची दिवाळी गोड करत आमचा फेटा बांधून सत्कार केला यामुळे मी भाराहून गेलो अशी भावना अविनाश जोगदंड यांनी बोलून दाखवली.सध्या राज्यात शासकीय अथवा निमशासकीय वर्ग तिन चार ची नोकर न करता खाजगी एजन्सी कडून कामे करवला जात आहेत.त्यानुसार येथील नगर परिषद मध्यें पाणी पुरवठा,विधूत विभाग, व स्वतच्छा विभागातील कामे खाजगी गुत्तेदाराकडून करवली जात आहेत.येथील स्वच्छता विभागाच्या (कचरा) घंटा गाडीवर ड्रायव्हर म्हणून कार्यरत असलेले श्री अविनाश जोगदंड व त्यांचे सहकारी (कचरा उचलणारे) श्री राम जोगदंड हे गेल्या दोन वर्षापासून येथील काळा मारूती,खडकपूरा,देशपांडे गल्ली, परळी वेस,जैन गल्ली भागात कार्यरत आहेच.दोन वर्षातील त्यांचे काम एकही नो तक्रार , अंत्यत चांगली सेवा,सकाळी वेळेत,काम,एकही बुंट्टी मारता,महिला व नागरिकांशी सौजण्याने वागणे-बोलणे आहे.चांगले काम करणाऱ्या चतूर्थ कर्मचाऱ्याच्या कामाची दखल येथील काळा मारूती भागातील जय सियाराम वर्तमान पत्राचे संपादक हनुमंत पोखरकर, शेतकरी सूरेशआप्पा व्यवहारे, दत्ता कापसे,प्रत्ताप लोमटे, बाबा लोमटे, विलास गाठाळ,धनंजयराव कापसे, भाऊसाहेब कापसे,शिवाजी कापसे, रामदाशी बुवा, अनिल सूर्यवंशी,अनील शेंगूळे, कलशेट्टी , डॉ. काळेगावकर, बहलिंग व्यवहारे आदी नागरिकानी एकत्रीत येवून सफाई कामगार अविनाश जोगदंड व राम जोगदंड यांना दिवाळीच्या निमित्ताने कुटुंबास महिनाभर पुरेल एवढ्या बारा किराणा सामानाची किट देउन त्यांना फेटा बांधून पुष्पगुच्छ देऊन यशोशीत सत्कार केला.

# कुटेंची भाजप एंट्री अन् मुंडेंची भाऊबीज

## बीडच्या राजकारणात भाजपची तगडी फिल्डींग! नेमकं घडतंय काय?

मराठा आरक्षणाच्या आंदोलनाची धग इतकी वाढली की त्यातून निघालेल्या ज्वालांतून शेकडो सुशिक्षित तरुणांच्या 'कॅरेक्टर'वर क्राईमचा शिक्का बसला. याच निमित्ताने ओबीसींचा आरक्षण बचाओ हा एल्गाराचीही सुरुवात झाली. कुटे दाम्पत्याला 'एंट्री' देत भाजपनेही सूचक इशारा दिला आहे. त्यामुळे आता भाऊबीजेच्या ओवाळणीत कृषीमंत्री धनंजय मुंडे बहीण भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडेंना कुठला मतदार संघ 'भेट' देणार हे पहावे लागेल. मात्र, या सामाजिक व राजकीय उलथापालथींमुळे जिल्ह्यातील दुष्काळाकडे सत्ताधाऱ्यांचा काणाडोळा होत आहे, हे तेवढेच खरे.

मराठा आरक्षण आंदोलनामुळे जिल्ह्यातील समाजमन ढवळून निघाले आहे. मात्र, आंदोलनाला ज्वालांचा डागही लागला. अंतरवाली सराटीच्या लाठीहल्ल्यात प्रमाणेच इथली जाळपोळ राज्यात गाजली. या निमित्ताने सत्ताधाऱ्यांनाच 'ओबीसी - मराठा' दरी निर्माण करण्याची संधीही मिळाली. यातून आता बॅनरची फाडाफाड होत असली तरी आपण पिढ्यान पिढ्या एकमेकांसोबत गुण्यागोविंदाने राहत असल्याचे, एकमेकांच्या सुखदु:खात सोबत राहिल्याचे, एकमेकांना मदत केल्याचे दोन्ही समाजांनी विसरु नये हे महत्वाचे. जिल्ह्याची सामाजिक रचना पाहता राजकीयदृष्ट्या दोन्ही घटक समप्रमाणात असल्याने बहुतांशी नेते 'डिफेन्स' खेळत आहेत. म्हणूनच आज शुक्रवारी अंबडला होणाऱ्या आरक्षण बचाओ एल्गार परिषदेबाबत पहिल्या फळीतील कोणीही नेत्यांनी जाहीर आवाहन केले नाही. पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, जयदत्त क्षीरसागर आदींची फोटो सभेच्या बॅनरवर आहेत.

दरम्यान, दुसऱ्या फळीतील नेत्यांनी या



परिषदेच्या तयारीसाठी जिल्हाभरात नियोजनाची धुरा सांभाळली. दरम्यान, मराठा आरक्षण आंदोलनाचे प्रमुख मनोज जरांगे पाटील यांच्या दुसऱ्या दौऱ्याच्या पहिल्या दिवशी जिल्ह्यातील अनौपचारिक भेटीला मिळालेला प्रतिसाद पाहता आंदोलनाच्या निमित्ताने दाखल ६६ गुन्हे आणि जिवे मारण्याच्या प्रयत्नांच्या कलमांमुळे आरक्षण मागणीची धार कमी झालेली नसल्याचे स्पष्ट झाले. याच काळात राज्यभर नाव असलेल्या कुटे ग्रुपचा घटक असलेल्या ज्ञानराधा मल्टीस्टेमधील ठेवींचा मुद्दाही समोर आला. मात्र, त्यातून महत्वाचे म्हणजे द कुटे ग्रुपमध्ये याच काळात साडेचार हजार कोटींची गुंतवणूक आणि त्यांची धावपळीत झालेली भाजप एंट्री हे मात्र आगामी राजकारणाच्या दृष्टीने मोठी घडामोड मानली जात आहे.

केंद्रातील सत्तेच्या माध्यमातून भाजपने कुटेंना अडचणीतून काढण्यासाठी परदेशी गुंतवणूकदारही मिळवून दिला अन 'इडी', 'सिबीआय', 'इनकम टॅक्स'च्या माध्यमातून भाजपच्या मांडवातही घेतले. त्यामुळे त्यांचे समीकरण देखील राष्ट्रवादीप्रमाणेच (अजित पवार गट) झाले. अडचणही टळली, चांगला पक्षही मिळाला अन् भविष्यात भाजपला वाटले तर चांगली संधीही. या माध्यमातून भाजप श्रेष्ठींनी 'आमच्या हाती तगडा मोहरा' असल्याचा सूचक इशारा पंकजा मुंडे यांना दिला आहे.

मराठा चेहरा, सामाजिक काम, हजारो कोटींचा समूह असे भाजपला निवडणुकीत हवे ते अस्त्र मिळाले आहे. त्यांचा वापर नेमका होतो कसा, हे पहावे लागेल. कालच कृषीमंत्री धनंजय मुंडें व पंकजा मुंडेंची भाऊबीज झाली. पण, ओवाळणी काय मिळणार. नव्या समीकरणात पंकजा मुंडेंच्या परळी मतदार संघावरच टाच आली आहे.

शुभमचा अण्णदानाचा महायज्ञ अखंडपणे चालू यंदाची दिवाळी थोडी वेगळीच पण राजयोग फाऊंडेशनने

# निराधार, वयोवृद्ध गरजवंतांची दिवाळी तरीही केली गोडच !

## बीड जिल्ह्यातील गरजवंत केंद्रांसह स्मशानभूमीची देखभाल करणाऱ्या कुटुंबीयांना घरपोच दिली दिवाळी फराळ भेट !!

बीड ।प्रतिनिधी

फराळाशिवाय दिवाळी हे समीकरणच जुळत नाही. काहीसा गोड, काहीसा तिखट पण चविष्ट असणारा दिवाळीतील महत्त्वपूर्ण ठेवा म्हणजे फराळ. समाजातील गरजु, वंचित व दुर्लक्षित व घटकांची दिवाळी गोड व्हावी याच उद्देशाने २०१७ पासून हजारो कुटुंबांसाठी दिवाळी फराळ वाटपाचा उपक्रम अविरत सुरु आहे. यावर्षी मागील दिवासातील तणावपूर्ण घटनेमुळे सामूहिक कार्यक्रमास परवानगी नसल्याने हा कार्यक्रम इच्छा असूनही घेता आला नाही. परंतु धूत परिवाराच्या मनात रुखरुख होती यावर्षी आपण गरजवंतारांच्या मदतीला आलो नाहीत. अनेक गरजवंत दारात येत होते.त्यामुळे धूत परिवाराने यावर्षी परिस्थितीवर मात करण्यासाठी आपणच गरजवंतांच्या दारात जाऊन त्यांना दिवाळी फराळ भेट देऊन दिवाळी गोड करण्याचा निर्णय घेतला. आणि तो प्रत्यक्षात अमलात देखील आणला. यामुळे अनपेक्षित रित्या मिळालेल्या भेटीमुळे गरजवंतांची दिवाळी आनंदाने द्विगुणीत झाल्याचे चित्र ठिकठिकाणी दिसून आले.

यंदाची दिवाळी ही गतवर्षीपेक्षा थोडी वेगळीच गेली, मागील काळात शहरात घडलेल्या घटनेनंतर परिस्थिती पूर्ववत झाल्यावर तयारीसाठी राहीलेल्या कमी दिवसांच्या अवधीमुळे आयोजनाला मर्यादा आल्या आणि दिवाळी फराळ वाटपाचा सार्वजनिक कार्यक्रम करता आला नाही, तरी राजयोग फाउंडेशन च्या माध्यमातून किमान पालकांचे छत्र नसलेल्या बालकांची, आधार नसलेल्या वयोवृद्धांची व अत्यावश्यक गरजु कुटूंबांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न करत, दिवाळी उत्सवात त्यांना फराळ साहीत्य पोहोच करण्यात आले.

यामधे पालीचे इन्फंट इंडिया आश्रम, कोळवाडी चे कामधेनु आरोग्यधाम वृद्धाश्रम, नेकनुर चे आपला परिवार वृद्धाश्रम, ढेकणमोहा येथील पसायदान सेवा प्रकल्प, शिरूर तालुक्यातील ब्र. येळंब चे सेवाश्रम प्रकल्प, रामगढ येथील आदिवासी समीकरण, बीड शहरातील जिव्हाळा - बेघर निवारा केंद्र, रामनगर येथील स्नेहसावली बालघर आणि वृद्धाश्रम, सौताडा परिसरातील निवारा बालगृह, कोळगाव चे आधार विद्यार्थी विकास प्रकल्प यासह बीड शहरातील स्मशानभूमींची देखभाल करणारे कुटुंब आणि अनेक गरजु कुटुंबांची दिवाळी राजयोग फाऊंडेशन ने काही प्रमाणात गोड करुन त्यांचे आशीर्वाद मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.

यावेळी इन्फंट चे दत्ता बारगजे, पसायदान चे गोवर्धन दराडे, आपला परिवारचे सुनील पवार, जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे राजु वंजारे, आदिवासी समीकरण चे सुधीर भोसले, स्नेहसावली चे निलेश मोहीते यांच्यासह शुभम कातांगळे, ऋषभ वाघमारे, अमर विद्यागर, कपिल जरांगे, गिरीष मुंदडा, समिर सय्यद, सागर वाहुळ, सुशांत राऊत, विशाल वाघमारे, राजदीप धुत, काशिफ चाऊस, मेघराज जगदाळे, शुभम वीर, संकेत करवा, शिवम घाडगे, अनिकेत उगले, पुष्कर मुंदडा, रमेश शिंदे, सय्यद ताहेर, नितीन तिपाले, राहुल बादाडे, ओंकार राऊत, पवन बन व राजयोग फाऊंडेशनचे इतर सदस्य उपस्थित होते.





**पुढच्या वर्षी पुन्हा हजारो कुटुंबीयांची दिवाळी गोड करूत - शुभम धूत**

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा उत्सव, कायम आरोग्यरूपी तेज सर्वांच्या आयुष्यात झळकावे व सर्वांना सुख, शांती, समृद्धी लाभावी हीच प्रार्थना, पुढच्या वर्षी परत हजारो कुटुंबांची दिवाळी गोड करण्याचा निश्चय व प्रयत्न करुयात असे फाउंडेशनचे अध्यक्ष, नगरसेवक शुभम धुत यांनी सांगितले.

# भायाळा साठवण तलावातुन अवैध पाणी उपसा सुरूच

## पाणीटंचाईचे संकट असतानाही जिल्हाप्रशासनाचे दुर्लक्ष:- डॉ.गणेश ढवळे



बीड:- जिल्ह्यातील १४३ लहानमोठ्या धरणांमध्ये सध्या केवळ २० टक्के पाणीसाठा शिल्लक असुन भविष्यात पाणीटंचाईला तोंड द्यावे लागेल यासाठी जिल्हा प्रशासनाने पाणी साठा आरक्षित ठेऊन अवैध पाणी उपसा प्रकरणी कारवाई करण्यासाठी पाटबंधारे, महसूल, महावितरण विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांचे संयुक्त पथक नेमले असुन ते केवळ कागदोपत्रीच असुन पाटोदा तालुक्यातील भायाळा साठवण तलावातुन आजही शेतीसाठी पाणी उपसा सुरूच असुन संबंधित प्रकरणात कर्तव्यात कसूर करणा-या व अपर जिल्हादंडाधिकारी बीड (पाणी टंचाई विभाग) शिवकुमार स्वामी यांचे आदेश डावलणा-या अधिकारी कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात यावी यासाठी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई, विभागीय आयुक्त यांना केली आहे.

बीड जिल्ह्यातील १४३ लहान मोठ्या धरणांमध्ये सध्या केवळ २० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. यामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य माणसांची चिंता वाढली असुन जानेवारी नंतर गंभीर पाणी टंचाईला तोंड द्यावे लागणार असुन यावर्षी दि.०७ जुन ते सप्टेंबर अखेरपर्यंत ४५५.१० टक्के पावसाची नोंद असुन त्याची टक्केवारी ६५.०८ एवढी आहे.परतीचा पाऊस अपेक्षे प्रमाणे झालाच नाही परीणामी जिल्ह्यातील सर्व धरणांमध्ये पाणीसाठा झालाच नाही.

बीड विभागात उपयुक्त पाणीसाठा (दलघमी)१४.२०४ असुन टक्केवारी ५४.२८ आहे. उन्हाची तिव्रता वाढत चालल्याने दिवसेंदिवस जमिनीतील पाणी पातळी घटत असुन बीडकरांसाठी धोक्याची घंटा आहे.विद्यमान अपर जिल्हादंडाधिकारी बीड (पाण टंचाई विभाग) शिवकुमार स्वामी तसेच तत्कालीन संतोष राऊत यांनी पाणीटंचाई आराखड्यात पिण्यासाठी पाणी आरक्षित ठेवत अवैध पाणी उपस्यावर प्रतिबंध करण्यासाठी पाटबंधारे विभाग, महसूल, पंचायत समिती, महावितरण, पोलिस प्रशासन विभागातील अधिकारी कर्मचारी यांचे संयुक्त पथक नेमून कारवाईचे आदेश दिलेले असतानाही आजही भायाळा साठवण तलावातुन पाणी उपसा सुरूच असुन सदर प्रकरणी अपर जिल्हादंडाधिकारी बीड (पाणी टंचाई विभाग)जि.का.बीड यांच्या आदेशाची अवमानना प्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# स्नेह ७५ च्यावतीने सुवर्ण पदक विजेती कोमल वाकळे हीचा सत्कार

## कोमल वाकळे हीने नगरचे नाव देशपातळीवर चमकविले - किशोर रेणाविकर

शिरुरकासार(प्रशांत बाफना)

प्रत्येकामध्ये काहीतरी कला गुण असतात, त्या गुणांचा विकास केला गेला तर आपणास यश नक्कीच मिळते. जिद्द, चिकाटी, मेहनतीच्या जोरावर कु.कोमल वाकळे हीने राष्ट्रीय वेटलिफ्टींग स्पर्धेत मिळविलेले यश हे नगरकरांसाठी अभिमानास्पद असेच आहे. नगरमध्येही कला, क्रिडा क्षेत्रातील अनेकांनी आपल्या कर्तुत्वाने नगरचे नाव देशपातळीवर चमकविले आहे. या गुणवंतांना प्रोत्साहन देणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. त्यामुळे त्यांना प्रेरणा मिळून पुढील स्पर्धांमध्ये नक्कीच यशस्वी होतील, असा विश्वास उद्योजक किशोर रेणाविकर यांनी केले.

स्नेह ७५ च्यावतीने गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय वेटलिफ्टींग स्पर्धेत सुवर्ण पदक पटकाविल्याबद्दल कु.कोमल वाकळे हीचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी किशोर रेणाविकर, रजनी ढोरजे, अभय गांधी, विश्वनाथ पोंदे, ईश्वर सुराणा, प्रमोद छाजेड, डॉ.शशिकांत उदास, अजित चाबुकस्वार आदि उपस्थित होते.याप्रसंगी विश्वनाथ पोंदे म्हणाले, स्नेह ७५ ग्रुपच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असतात. त्याचबरोबर नगरचे नाव विविध क्षेत्रात उंचविणार्यांचा सत्कार करुन त्यांना प्रोत्साहन देण्यात येते. तसेच समाजातील विविध क्षेत्रातील कष्टकार्यांचाही सन्मान करुन त्यांच्या पाठीवर शब्बासकीची थाप दिली जाते. कु.कोमल वाकळे हीने वेटलिफ्टिंगसारख्या क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर मिळविलेले यश खरोखर कौतुकास्पद असेच आहे. त्यामुळे इतर खेळाडूंनाही त्यातून प्रोत्साहन मिळेल, असे सांगितले. यावेळी कोमल वाकळे म्हणाली, वेटलिफ्टिंग हा मेहनतीचा क्रीडा प्रकार आहे. मेहनत, सातत्य हे महत्वाचे असते. राष्ट्रीय स्पर्धेत मिळालेले यश हे सर्वांची प्रेरणा आणि सदिच्छांमुळे मिळाले आहे. आजच्या सत्काराने आपणास प्रोत्साहन मिळणार असून, यापुढील काळात देशासाठी पदक मिळविण्याची इच्छा असल्याचे कु.कोमल यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रजनी ढोरजे यांनी केले तर प्रमोद छाजेड यांनी आभार मानले. यावेळी कु. कोमल हीचा फेटा बांधून, स्मृतीचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी नारायण वाकळे, अलका वाकळे आदिंसह कुटूंबातील सदस्य उपस्थित होते.

# कडा येथे सोमवारी ग्रामपंचायत समोर वाट द्या वाट आंदोलन

## तहसीलदार,गटविकास अधिकारी आष्टी यांच्याकडे केली रस्त्याची मागणी

कडा ।प्रतिनिधी

येथिल एका गल्लीत राहत्या घरात ये-जा करण्यासाठीचा एकमेव १२ फुटी रस्तावर अतिक्रमणे केल्यामुळे रस्ता अरूंद झाला. फक्त दोन फुटांच्या आसपास रस्ता मोकळा राहिला. याकरिता आदित्य संतोष मोरे या युवकाने कडा ग्रामपंचायत कार्यालयाला दि.८ सप्टेंबर २०२३ रोजी लेखी मागणी केली की, आमच्या राहत्या घराकडे ये - जा करण्यासाठी एकमेव रस्ता आपण मोजणी करून त्या मोजणीत येणारे अतिक्रमणे काढून रस्ता मोकळा करून द्यावा अशी मागणी केली. परंतु त्या लेखी अर्जाची दखल घेतली नाही.म्हणुन आदित्य मोरे या युवकाने पुन्हा ग्रामपंचायत कार्यालयाला दि.५ ऑक्टोबर २०२३ रोजी स्मरणपत्र देऊन मागणी केली. दोन वेळेस लेखी तक्रार अर्ज दाखल करूनही ग्रामपंचायत ने दखल घेतली नाही रस्ता मोकळा करून दिला नाही. रस्ता अरूंद झाला त्यामुळे खुप त्रास सहन करावा लागत आहे



त्यात काही कारवाही होतांना दिसत नाही. दोन महिने झाले तक्रार अर्ज दाखल करून तरी ही आजपर्यंत रस्ता मोकळा करून मिळत नाही म्हणुन या रस्त्याची मोजणी करून मोजणीत येणारे अतिक्रमणे काढून रस्ता मोकळा करून द्यावा नसता ग्रामपंचायत कडा समोर सोमवार दि.२० नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी १० वाजता वाट द्या वाट आंदोलन करू असे लेखी अर्ज आदित्य मोरे ह्याने तहसीलदार,गटविकास अधिकारी आष्टी यांना दिले आहे.

# भाजप प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी ऊसतोडणी कामगारांसोबत साजरी केली दिवाळी

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

भाजपाचे राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी शेतकऱ्यांच्या ऊसाच्या फडावर जावुन दिपावलीनिमित्त ऊसतोड कामगारांना कपडे, फराळ साहित्य वाटप केले. हातात कोयता घेवुन कुडकुडत्या थंडीत रात्रंदिवस कष्ट घेणाऱ्या बिचाऱ्या कामगारांना मदतीचा हात जगण्याचा आनंद देणारा वाटला. भाजपाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी कार्यकर्त्यांनी दिवाळी गरिबाच्या पालावर जावुन साजरी करण्याचे आवाहन केले होते. तोच संस्काराचा धागा पकडून कुलकर्णी यांनी पक्षाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे आणि जिल्ह्याच्या खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक दायित्व पार पाडले.

प्रवक्ते राम कुलकर्णी नेहमीच सामाजिक कार्यात सहभाग घेतात. सामान्य माणसांसाठी आयुष्य वेचणारा कुलकर्णी परिवार या दृष्टीने त्यांच्याकडे पाहिल्या जाते. यंदाची दिवाळी गरिबांच्या पालावर जावुन साजरी करावी अशा प्रकारचे आवाहन संघटनात्मक पातळीवर प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील पक्षाचे सर्व




प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते यांना केले होते. त्या अनुसरून कुलकर्णी यांनी दिपावली पाडव्याच्या निमित्ताने ऊस तोड कामगारांच्या सोबत दिपावली साजरी केली. सिरसाळा पट्ट्यात एका शेतकऱ्यांच्या ऊसाच्या फडावर तोडणी चालु होती. त्या ठिकाणी प्रत्यक्ष जावुन ऊसतोड कामगारांना थंडीपासून बचाव व्हावा म्हणून चांगल्या दर्जाच्या

दिपावली साजरी केली. प्रत्येक माणुस आपल्या परीने आयुष्य जगत असतो. ऊसाच्या फडात का करणं बोलणं तेवढं सोपे नसतं. रात्री अपरात्री तोडणी करावी लागते. थंडीची उन्हाची तमा न बाळगता घाम गाळावा लागतो. शेवटी गरिबाला आपल्यासोबत किंवा पाठीमागे कुणी आहे असा किरण जरी पहायला मिळाला तरी जगण्यात आशावाद वाटतो. ज्यावेळी कुलकर्णी परिवाराने फडावर येवुन दिवाळीचा कोयता हातात घेवुन तोडणी करणाऱ्यासोबत आनंद साजरा केला त्यावेळी कामगारांच्या चेहऱ्यावर जो भाव होता ते खरं सामाजिक दायित्व आणि जबाबदारी दर्शविणारा होता. यावेळी बीडच्या रोटरी क्लबचे अध्यक्ष कल्याण कुलकर्णी, अनुषे, टोळी मुकादम आदी मान्यवरांची उपस्थिती होती. वास्तविक पहाता प्रत्येक वर्षी कुलकर्णी परिवार अशाच प्रकारे दिवाळी साजरा करत असतो. जेष्ठ बंधु प्रा.एस.पी. कुलकर्णी यांनी देखील दिवाळीनिमित्त गरिबांना साहित्याचे वाटप केले.


केवळ ऊसतोड कामगारांनाच नव्हे तर कुलकर्णी परिवाराकडे शेतात काम करणारे सालगडी, भागीन, वाहन चालक या सर्वांनाच दिवाळीनिमित्त हातभार लावुन दायित्व पार पाडले. परोपकार आणि सामाजिक दायित्वाची गोडी वारसानुसार कुटुंबात चालत आलेली असेल तर नव्या पिढीतले लेकर देखील त्याचे अनुकरण केल्याशिवाय रहात नाहीत हा अनुभव कुलकर्णी चादरी, टॉवेल-टोपी, फराळाचे पदार्थ देवुन कुटुंबियाबाबत नेहमीच आलेला दिसतो.

बार्टीच्या २०२२ च्या पिएचडी संशोधक विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासुन सरसकट फेलोशिप द्या व राज्यातील अनुसूचीत जातीच्या

# विद्यार्थ्यांची शैक्षणिक कोंडी थांबवण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे एक दिवसीय धरणे आंदोलन....! पँथर नितीन सोनवणे

ऑल इंडीया पँथर सेनेचे १७ नोव्हेंबरला राज्यव्यापी धरणे आंदोलन.. पँथर नितीन सोनवणे

अनुसूचित जातीच्या पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांचा पीएच.डी. साठी प्रवेश होऊन आज २१ महिने झाले असून, अनुसूचित जातीच्या बार्टीकडे अर्ज केलेल्या पिएचडीच्या २०२२ च्या ७१९ विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासुन सरकसट फेलोशिप देण्याच्या मागणीसाठी मागील २१ महीण्यापासुन विद्यार्थी संघर्ष करत असुन बार्टी कार्यालय पुणे येथे गेल्या ५५ दिवसापासुन २०२२ चे पिएचडीचे संशोधक विद्यार्थी नोंदणी दिनांकापासुन सरसकट फेलोशिपच्या मागणीसाठी विद्यार्थी उपोषण करत आहेत व याच न्याईक मागणीसाठी मुंबई,नागपुर व पुणे या ठिकाणी मोर्चे,आंदोलने,उपोषणे करुणही विद्यार्थ्यांची मागणी रास्त आसताना झरीतील शुक्राचार्यू आसलेले सामाजिक न्याय विभागाचे मंत्रालयीन सचिव सुमंत भांगे हे कसल्याच प्रकारे विद्यार्थ्यांना न्याय देण्याची भुमिका घेत नाहीत व वारंवार मागणी करुण शिंदे फडणवीस सरकार विद्यार्थ्यांना न्याय देत नाही तर दुसऱ्या बाजुला सारथीच्या संशोधक विद्यार्थ्यांना दि. २१.०९.२०२२ च्या पत्रानुसार ८५१ मुलांना सरसकट फेलोशिप मंजूर होऊन त्यांच्या खात्यात रक्कम ही जमा केली जाते व २०२३ ची जाहिरात ही सारथी संस्थेच्या पी.एच.डी. धारकांसाठी दिली जाते. तर महाज्योती या फेलोशिप देणाऱ्या संस्थेकडे पाहिले असता ती संस्था पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना २०२२ मध्ये दि. ०२.११.२०२२ च्या पत्रानुसार १२२६ विद्यार्थ्यांना सरसकट फेलोशिप मंजूर करून त्या फेलोशिपची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा केली जाते व २०२३ ची जाहिरात दिली जाते. सारथी व महाज्योती संस्था विद्यार्थ्यांचा पिएचडीला प्रवेश झाल्यावर जवळपास तिन महीण्यात प्रक्रिया पुर्ण करुण सरसकट २०२२ च्या विद्यार्थ्यांना फेलोशिप देते तर अनुसूचित जातीच्या २०२२ च्या पीएच.डी. धारक विद्यार्थ्यांना फेलोशिप देणारी बार्टी ही संस्था पीएच.डी. धारकांचा प्रवेश होऊन २१ महिने झाले असले तरीही व गेल्या ५५ दिवसापासुन उपोषण चालु असतानाही या महाराष्ट्रात बार्टीच्या २०२२ च्या विद्यार्थ्यांना सरसकट फेलोशिप देण्याचा निर्णय शिंदे फडणवीस सरकार अद्यापही घेत नाही ही अत्यंत खेदाची बाब आहे व सरकार जात बगुन विद्यार्थ्यांना न्याय देणार का आसा संतप्त प्रश्न पडला आहे ? पिएचडीला प्रवेश होऊन २१महीने झाले असता विद्यार्थ्यांच्या



खात्यात बार्टीकडून फेलोशिपची अद्याप दमडीही जमा करण्यात आली नाही तर व हे विद्यार्थी कामगार,अल्पभूधारक शेतकरी,कष्टकरी कुंटुबातील विद्यार्थी असल्याने संशोधन कसे करणार ? या शैक्षणिक व आर्थिक अन्याया विरोधात आणि बार्टीकडे अर्ज केलेल्या पीएच.डी. च्या २०२२ च्या ७१९ संशोधक विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन दिनांकापासून वाढीव तरतुदीसह कागदपत्र पडताळणी करून तात्काळ सरसकट अवार्ड लेटर देऊन एका महिन्याच्या आत फेलोशिप सरसकट विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी व प्रलंबीत स्वधार व शिष्यवृतीची रक्कम त्वरीत विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी, बार्टीच्या २०१८ च्या १९४ विद्यार्थ्यांचा प्रलंबीत प्रस्ताव मंजुर करुण फेलोशिप खात्यात जमा करण्यात यावी,शासकीय वस्तीग्रहातील विद्यार्थ्यांना दर्जेदार जेवनासाठी दर महीण्याला चौकशी पथक नेमऊन दर महीण्याला शासकीय वस्तीग्रहाला भेट देण्यासाठी कमीटी गटीत करावी,अनुसूचीत जातीसाठी स्वतंत्र बजेट कायदा लागु करा,नॉन क्रिमिलेअरची अट अनुसूचीत जातीसाठीची त्वरीत रद्द करा ईत्यादी मागण्या घेऊनऑल इंडीया पँथर सेना गेंड्याची कातडी घेऊन झोपेच सोंग घेणाऱ्या शिंदे फडणवीस सरकार व सुमंत भांगे यांना जाग करण्यासाठी १७ नोव्हेंबर ला अनुसूचीत जाती विद्यार्थी शैक्षणिक अधिकार बचाव राज्यव्यापी धरणे आंदोलन करणार आहे आसा आंदोलनात्मक ईशारा पँथर दिपक भाई केदार यांनी माध्यमांशी बोलताना दिला आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT